पेज - १

# संचित (शेवटचे शब्द)

संत ज्ञानेश्वरांचे वडिल विठ्ठलपंत ब्रह्मसभे समोर आर्जव करतात, कि माझी मुले मोठी होत आहेत त्यांना मुंजी साठी परवानगी द्या, पण ब्रह्मसभेने त्यांना सांगितले कि आपण गृहस्थमी असून ब्रह्मचर्याची दिक्षा घेतली व परत गृहास्थम स्विकारला आहे, हे सरळ सरळ धर्मसभेचे व शास्त्रांचे उल्लघंन आहे. व हे पातक आपण केले आहे हे सांगण्यात आले असे धर्म पीठाकडून, त्यावेळेस समाज किती रूढी व परंपरा गुरफटलेला होता.

धर्मसभेपुढे विठ्ठलपंत आपली बाजू मांडतात, गेल्या वीस वर्षापासून समाजापासून बहिष्कृत आहे, माझ्या मुलांच्या भविष्य साठी व सुखासाठी आपण जी शिक्षा देणार ती आम्ही सपत्नीक भोगण्यास तयार आहोत. बरेच विचाराअंती ब्रह्मसभा हा निर्णय घेते की मुलांच्या भविष्यासाठी आम्ही मुलांच्या मुंजीसाठी ही सभा परवानगी देत आहेत पण त्यासाठी विठ्ठलपंत आपणास देहदंडाची शिक्षा करत आहे हे जर आपणास मान्य असेल तस्र आळंदी धर्मसभेस तसे पत्र देऊ. बघा त्यावेळेसचे धर्मशास्त्र हे रूढी व परंपराच्या साखळीत अडकलेले होते त्यांच्या समोर देवत्व फिके पडले, मोठ्या कष्टांने व वैराग्य शील मुर्ती असलेले विठ्ठलपंत हा निर्णय मान्य करतात.

हाच धर्मसभेचे निर्णय इती वृत्तांत विठ्ठलपंत घरी रूक्मीणीबाईना सांगतात ते ऐकून रुक्मीणीबाईच्या मनावर मोठा आघात होतो. थोड्या वेळासाठी बाई पंताना विनंती करतात की आपण हा फेरनिर्णय घ्यावा. पण एकदा धर्मसभेची दिलेली शिक्षा घेणार आहे, हा माझा सभेतील निर्णय मी बदलू शकत नाही, रूक्मीनी - हे बघा संसार हा सगळ्यानाच प्रिय असतो पण मुलांच्या सुखासाठी व धर्मसभेचे पालन हे आपले आदय कर्तव्य आहे. त्यामुळे आपण हा शोक सावरावा अशी विनंती वजा आदेश समजा.

त्यावर रूक्मणीबाई पंताना मला कसलाही लोभ नाही, असे आपली नजर चुकवून बोलल्यात.

पण बाई आतून खुप दुःखी होत्या, कधी होत्या? का हे असले भोग जिवंतपणी, ह्या नरक यातना, का भोगतो आम्ही? कुणाचे शब्दांने वाईट केले नाही, काम व्रते सत्य सदाचरण, कैवल्य, उपवास केलेत काहीच कशी पुण्याई आडवी येत नाही का? हे असे विचार मनी असतांना, "रुक्मीनी बाई" विठ्ठलपंतांना म्हणतात पंत तुमचा निर्णय योग्य आहे, मी आपणास जाणते आपण वैराग्याची मूर्ती आहात त्यामुळे आपला निर्णय मान्य आहे, मी आपणा बरोबर येणार. त्यावेळेस निवृत्ती वय दहा, ज्ञानेश्वर आठ, सोपान चार व मुक्ता वय दोन होते. अश्या ह्या वैराग्यशील व अलौकिक कुटूंबाच्या जीवनात किती खडतर प्रवास होता, त्याची कल्पना न केलेली बरी, पुढच्या प्रवासाचा मजकूर लिहितांना गात्र जड होतात, व विचार सुध्दा थबकतात

अश्या एका मध्यरात्री सव बाळं निद्रेचे अधीन "पंत व रुक्मीनीबाई" सर्व मुलांना भरल्या डोळ्यांनी मन भरून पाहतात निरपराध बाळांची तरी काय चूक होती? पण हे ईश्वरीसंकेत होते अतिशय जडमनाने, पतीपत्नी मुलांना आशिर्वाद देतात व जड अंतकरणाने निरोप घेतात. त्यावेळेस रुक्मीणीबाईंचे अंतकरण अश्रुरशा ढवळून निघते काठावरून तालबध्द खळखळणारी इंद्रायणीचा आवाज थोडावेळ निशब्द होतो. रात्रीचा वारा मुका होऊन अश्रुरशा वाहण्याचे थांबतो. एकीकडे पती निष्ठा व दुसरीकडे पोटाची मुले, अश्या ह्या कर्मठ धर्मसभा, व समाज अश्या अवस्थेत देहदंडाची शिक्षेस आनंदाने समोर जातात. कारण मुलांची गुंज कधी त्यांना समाजात स्थान मिळावे, "संन्याशयाची मुले" ही निंदा, नालस्ती थांबावी, हे तर नशिबांचे व "प्राक्तनातले भोग" हा दुःखद व अतिशय कष्टप्रद प्रसंग व वात्सल्याचा मोठा त्याग. पुढे ह्या सर्व बाळांचा इतिहास आपणास ज्ञात आहे..

—x—x—x—x—

नितिन शिंपी - ९२२५९९७३५२.
मेल आयडी : nitinshimpi77@gmail.com.